शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूग्धजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा
पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2023-25

अधिक मास अधिक खास
ऑफर कालावधी १७ मे २०२६ ते १५ जून २०२६
चांदीची जोडवी 100% मजुरीवर सूट
काजळे ज्वेलर्स
9601 222 777
9615 222 777
बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर

अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक १४२ । किंमत - २ रू संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) शनिवार । १३/०६/२०२६ । पाने - ६

100th Anniversary
Estd 1927
Dande Gold & Diamonds

अधिक मास निमित्त
पायल व जोडवी महोत्सव

गोविंद™
दर्जा, विश्वास, कला



अटी लागू*


जुनी चांदी देऊन नवीन चांदी घेण्याची सुवर्णसंधी

पायल व जोडवीच्या मजुरीवर
25% पर्यंत सूट

5000+ डिझाइन्स | 17 मे ते 15 जून 2026

दत्तमंदिर स्टॉप, नाशिक रोड 7774084019
वाजे पेट्रोल पंप समोर, सिन्नर 8983275498
यशोधन कार्यालया समोर, संगमनेर 9156009908

गोविंद™ दर्जा, विश्वास, कला
दंडे गोल्ड & डायमंड्स 1927 पासून




# लाडक्या बाहिणींसाठी समाज कल्याणच्या निधीवर डल्ला - उत्कर्षा रुपवतेंचा आरोप

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेसाठी समाज कल्याण विभागाच्या ३४४.७४ कोटी रुपयांच्या निधीचे वळवण करण्यात आल्याचा गंभीर आरोप वंचित बहुजन आघाडीने केला आहे. राज्य प्रवक्त्या उत्कर्षा रूपवते यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात सरकारच्या आर्थिक धोरणांवर जोरदार टीका करत हा निधी अनुसूचित जातींच्या कल्याणासाठी राखीव असल्याचे नमूद केले आहे.



रूपवते यांनी म्हटले आहे की, लाडकी बहीण योजना सुरू ठेवण्यासाठी सरकारकडून सातत्याने समाज कल्याण विभागाचा निधी वळवला जात आहे. विशेषतः अनुसूचित जातींसाठी मंजूर करण्यात आलेल्या निधीचा वापर इतर योजनांसाठी केला जात असल्याने समाज कल्याण विभागाच्या मूळ योजनांवर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

त्यांच्या मते, समाज कल्याण विभागाच्या विविध कल्याणकारी योजनांचे नियोजन आणि अंमलबजावणी कशी होणार याचा विचार न करता सरकारचे संपूर्ण लक्ष केवळ लाडकी बहीण योजना सुरू ठेवण्यावर केंद्रित झाले आहे. त्यामुळे सामाजिक न्यायाच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या योजनांच्या भवितव्याबाबत प्रश्न निर्माण होत आहेत. यावेळी राज्याच्या आर्थिक परिस्थितीवरही त्यांनी भाष्य केले. महाराष्ट्र सरकारवर सध्या ११ लाख कोटी रुपयांहून अधिक कर्जाचा बोजा असल्याचे सांगत, अशा परिस्थितीत कोणतेही ठोस आर्थिक नियोजन न करता एका योजनेसाठी इतर विभागांचा निधी वळविण्याची पद्धत ही चिंताजनक आणि निंदनीय असल्याचे त्यांनी म्हटले.

सरकारने स्पष्टीकरण द्यावे : वंचित बहुजन आघाडी -

समाज कल्याण विभागातील ३४४.७४ कोटी रुपयांच्या निधी वळवण्यामागील कारणे सरकारने जाहीर करावीत तसेच अनुसूचित जातींसाठीच्या योजनांवर त्याचा काय परिणाम होणार याबाबत स्पष्ट भूमिका मांडावी, अशी मागणी वंचित बहुजन आघाडीने केली आहे.

लाडकी बहीण योजनेचा भार सामाजिक न्यायाच्या योजनांवर टाकणे योग्य नाही. राज्यातील दुर्बल घटकांच्या हक्काच्या निधीचे संरक्षण झाले पाहिजे, असे मत उत्कर्षा रूपवते यांनी व्यक्त केले आहे.

# भेसळमुक्त महाराष्ट्रासाठी तुकाराम मुंढेच हवेत

## संगमनेरकरांची मुख्यमंत्र्यांकडे आर्त हाक

छाया – काशिनाथ गोसावी



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या संभाव्य बदलीच्या चर्चांमुळे संगमनेरमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत असून, त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहत नागरिकांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन पाठविले आहे. भेसळयुक्त अन्नपदार्थ, बनावट औषधे, गुटखा व इतर आरोग्यघातक पदार्थांविरोधात मुंढे यांनी सुरू केलेल्या धडक मोहिमेमुळे सर्वसामान्य नागरिकांना दिलासा मिळाल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

निवेदनात म्हटले आहे की, अनेक वर्षांपासून खवा, पनीर, दूध, खाद्यतेल आणि इतर अन्नपदार्थांमध्ये मोठ्या प्रमाणावर भेसळ होत असल्याच्या तक्रारी सातत्याने होत होत्या. मात्र स्थानिक यंत्रणांकडून प्रभावी कारवाई होत नसल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले होते. भेसळयुक्त अन्नपदार्थांमुळे मधुमेह, रक्तदाब, कॅन्सर, टायफॉईड, कावीळ यांसारख्या गंभीर आजारांचे प्रमाण वाढल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. विशेषतः लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिक यांना याचा मोठा फटका बसत असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

तुकाराम मुंढे यांनी आयुक्तपदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर भेसळखोर, बनावट औषध विक्रेते आणि आरोग्याशी खेळ करणाऱ्या माफियांविरोधात कठोर कारवाई सुरू केली. त्यामुळे नागरिकांमध्ये प्रशासनाबाबत विश्वास निर्माण झाला असून, त्यांच्या कारवाईमुळे अन्न व औषध क्षेत्रातील गैरप्रकारांना मोठा आळा बसत असल्याचे मत व्यक्त करण्यात आले आहे. तसेच गुटखा, मावा, तंबाखू आणि इतर आरोग्यघातक पदार्थांच्या विक्रीवरही त्यांनी कठोर भूमिका घेतल्याने नव्या पिढीचे आरोग्य सुरक्षित राहण्यास मदत होणार असल्याचे नागरिकांनी नमूद केले आहे. संगमनेरमधील सर्वपक्षीय नागरिकांनी मुख्यमंत्री फडणवीस यांना विनंती केली आहे की, तुकाराम मुंढे यांची बदली करू नये. हॉटेलमधील निकृष्ट अन्नपदार्थ, दुधातील भेसळ आणि बनावट औषधांमुळे नागरिकांचे जीवन धोक्यात आले असताना अशा कर्तव्यदक्ष अधिकाऱ्यांची आवश्यकता अधिक असल्याचे त्यांनी म्हटले आहे. मुंढे यांची बदली झाल्यास संगमनेरमध्ये तीव्र लोकआंदोलन उभारले जाईल. त्याची संपूर्ण जबाबदारी प्रशासन आणि सरकारवर राहील, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.

या निवेदनावर नगरसेवक गजेंद्र अभंग, माजी नगरसेवक कैलास वाकचौरे, शाम कर्पे, सतिष आहेर, निखील पापडेजा सचिन पानसरे, शतानंद खामकर, राजेंद्र गुंजाळ, शशिकांत घोलप, अशोक खताळ, शांताराम शिंदे, मच्छिंद्र वाळुंज, हंसराज कोळपकर, भैय्या तांबोळी, विजय भडांगे, मधुकर मेंगाळ, सार्थक भारती, धनंजय मुर्तडक, शिवाजी नवले, भीमराज पवार, संजय क्षत्रिय, अभिषेक गिरी, पवन नावंदर यांच्यासह अनेकांच्या सह्या आहेत.

# जिल्हा पोलीस दलात मोठे फेरबदल

## अधीक्षक सुदर्शन यांचे धक्कातंत्र



युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर- पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी जिल्हा पोलीस दलात मोठे फेरबदल करत अनेक महत्त्वाच्या पोलीस ठाण्यांच्या प्रभारी अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या आहेत. स्थानिक गुन्हे शाखेचे (एलसीबी) पोलीस निरीक्षक किरण कबाडी यांच्यासह श्रीरामपूर शहर, राहुरी, नेवासा, पाथर्डी, अहिल्यानगर शहरातील तोफखाना, कोतवाली, भिंगार कॅम्प, एमआयडीसी तसेच श्रीगोंदा, घारगाव आदी पोलीस ठाण्यांच्या प्रभारी अधिकाऱ्यांमध्ये बदल करण्यात आला आहे. काही अधिकाऱ्यांचा दोन वर्षांचा कार्यकाळ पूर्ण झाल्याने त्यांची बदली करण्यात आली असून काहींची मुदतपूर्व बदली करण्यात आली आहे. या बदल्यांमध्ये अधीक्षक सुदर्शन यांनी धक्कातंत्र वापरल्याची चर्चा पोलीस वर्तुळात सुरू आहे.

तत्कालीन पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या विशेष मर्जीतील मानले जाणारे किरण कबाडी यांना एलसीबीचे प्रभारी करण्यात आले होते. मात्र अवघ्या ११ महिन्यांत त्यांची बदली करण्यात आली आहे. कर्मचार्याने केलेले ड्रग्स विक्री प्रकरण, गुटखा प्रकरणातील कर्मचाऱ्यांचा कथित सहभाग, बनावट दूध प्रकरणासह इतर काही गुन्ह्यांचा रखडलेला तपास ही त्यांच्या बदलीमागील कारणे असल्याची चर्चा आहे. त्यांची बदली शिर्डी येथील साई मंदिर सुरक्षा विभागात करण्यात आली आहे. दरम्यान, एलसीबीला अद्याप पूर्णवेळ प्रभारी देण्यात आलेला नसून सहायक पोलीस निरीक्षक हरीष भोये यांच्याकडे तात्पुरता पदभार सोपविण्यात आला आहे.

तोफखाना पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक जगदीश भांबळ यांची मुदतपूर्व बदली नियंत्रण कक्षात करण्यात आली असून त्यांच्याकडे पोलीस उपअधीक्षक (गृह) पदाचा अतिरिक्त कार्यभारही देण्यात आला आहे. त्यांच्या जागी अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाचे प्रभारी बालाजी वैद्य यांची नियुक्ती करण्यात आली आहे. नियंत्रण कक्षातील पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख यांची राहुरी पोलीस ठाण्याच्या प्रभारीपदी नियुक्ती करण्यात आली आहे. राहुरीचे पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांची बदली श्रीगोंदा पोलीस ठाण्याच्या प्रभारीपदी करण्यात आली आहे. श्रीगोंद्याचे प्रभारी किरण शिंदे यांची बदली अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाच्या (एएचटीयू) प्रभारीपदी करण्यात आली आहे. पाथर्डीचे प्रभारी विलास पुजारी यांची बदली मानव संसाधन विभागात करण्यात आली असून मानव संसाधन विभागाचे प्रभारी पोलीस निरीक्षक आनंद कोकरे यांची नियुक्ती पाथर्डी पोलीस ठाण्याच्या प्रभारीपदी करण्यात आली आहे. कोतवाली पोलीस ठाण्याचे प्रभारी संभाजी गायकवाड यांची बदली दहशतवाद विरोधी पथकाच्या प्रभारीपदी करण्यात आली असून श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्याचे प्रभारी नितीन देशमुख यांच्याकडे कोतवाली पोलीस ठाण्याची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्याला अद्याप पूर्णवेळ प्रभारी देण्यात आलेला नसून सहायक पोलीस निरीक्षक गणेश जाधव यांच्याकडे तात्पुरता पदभार देण्यात आला आहे. नेवासा पोलीस ठाण्याचा कार्यभार यापूर्वी सायबर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सागर ढिकले यांच्याकडे तात्पुरत्या स्वरूपात होता. आता नेवासा पोलीस ठाण्यास पूर्णवेळ प्रभारी मिळाला असून पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांची तेथे नियुक्ती करण्यात आली आहे.

शहर वाहतूक शाखेचे प्रभारी बाबासाहेब बोरसे यांची बदली घारगाव पोलीस ठाण्याच्या प्रभारीपदी करण्यात आली आहे. त्यांच्या जागी पोलीस निरीक्षक महेश पाटील यांची बदली करण्यात आली आहे. घारगावचे प्रभारी सहायक पोलीस निरीक्षक हेमंत थोरात यांची बदली एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या प्रभारीपदी करण्यात आली आहे. एमआयडीसीचे प्रभारी माणिक चौधरी आणि भिंगार कॅम्पचे प्रभारी जगदीश मुलगीर यांची बदली आर्थिक गुन्हे शाखेत करण्यात आली आहे. भिंगार कॅम्प पोलीस ठाण्याची धुरा कोतवाली पोलीस ठाण्यात कार्यरत असलेल्या महिला सहायक पोलीस निरीक्षक तेजश्री थोरात यांच्याकडे सोपविण्यात आली आहे. तसेच राहाता पोलीस ठाण्याचा पदभार दीपक सरोदे, कर्जत पोलीस ठाण्याची जबाबदारी हनुमान गायकवाड यांच्याकडे देण्यात आली असून लोणी पोलीस ठाण्याचे प्रभारीपद सहायक पोलीस निरीक्षक युवराज आठरे यांच्याकडे ठेवण्यात आले आहे.

# जिल्ह्यातील शासकीय शाळांमध्ये नव्या शैक्षणिक वर्षाचे स्वागत एका तासाच्या खेळातून



युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर- जिल्ह्यातील प्रत्येक शासकीय शाळा १५ जून रोजी, नव्या शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे स्वागत 'पहिला दिवस शाळेचा, एक तास खेळाचा' या संकल्पनेअंतर्गत करेल, अशी माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी दिली.

आंतरराष्ट्रीय खेळ दिनानिमित्त द ओपनट्री फाउंडेशन व स्नेहालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'खेळ जपा, बालपण जपा' या महाराष्ट्रातील पहिल्या जिल्हास्तरीय चर्चासत्रात ते बोलत होते. या कार्यक्रमात महाराष्ट्र विधान परिषदेचे सदस्य सत्यजीत सुधीर तांबे यांनी शिक्षण केवळ पाठ्यपुस्तकांपुरते मर्यादित न राहता विद्यार्थ्यांच्या सृजनशीलता, संवादकौशल्य, नेतृत्वगुण आणि व्यक्तिमत्त्व विकासाला चालना देणारे असावे, असे सांगितले. विद्यार्थीकेंद्रित, अनुभवाधारित व कौशल्याधारित शिक्षण व्यवस्थेची आवश्यकता अधोरेखित करत त्यांनी हा उपक्रम जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये आणि विशेषतः संगमनेर येथे लवकरात लवकर राबविण्याची इच्छा व्यक्त केली.

संयुक्त राष्ट्रांच्या बालहक्क करारातील कलम ३१ नुसार खेळाला प्रत्येक बालकाचा मूलभूत हक्क म्हणून मान्यता देण्यात आली आहे. याच पार्श्वभूमीवर आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मधील आनंददायी शिक्षणाच्या दृष्टिकोनाशी सुसंगत अशी सखोल चर्चा अहिल्यानगर जिमखाना येथे झाली. उद्घाटनपर भाषणात द ओपनट्री फाउंडेशनच्या सह-संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी श्वेता चारी यांनी शिक्षण प्रक्रियेतून खेळ हरवल्यास मुलांच्या भविष्यावर होणाऱ्या परिणामांविषयी चिंता व्यक्त केली.


स्नेहालयाचे संस्थापक डॉ. गिरीश कुलकर्णी यांनी खेळ हा मुलांपर्यंत पोहोचण्याचा सर्वोत्तम मार्ग असून त्यातून मुलांना स्वतःला व्यक्त करण्याची संधी मिळते, असे नमूद केले. नुवामा ग्रुपच्या ईएसजी व सीएसआर प्रमुख रश्मी नागोरी यांनी खेळाच्या माध्यमातून मुलांचा आत्मविश्वास व चिकित्सक विचारक्षमता वाढत असल्याचे सांगितले. नांदेडच्या संस्कृती संवर्धन मंडळाच्या शिक्षण प्रमुख श्रद्धा रोहित देशमुख यांनी खेळामुळे शिक्षक व विद्यार्थ्यांमधील (पान ४)











संगमनेरकरांनी गौरविलेले

**||जय श्रीराम||**

**सुपर शॉपी**

निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक

जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर

एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्

**प्रोप्रा. अशोक रा. जाधव**

फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२

क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

**आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा**

संपर्क

८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४

७६२०३८८२३०

**धन्वंतरी**

We treat He cure's

मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल

डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४

डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४

उपलब्ध सुविधा

मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी

महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत

डायलेसिस सुविधा उपलब्ध

या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे

धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

**आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा**

संपर्क

८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४

७६२०३८८२३०




# जागतिक दृष्टिदान दिनानिमित्त रविवारी नेत्र तपासणी शिबिर

युवावार्ता (प्रतिनिधी) संगमनेर -

जागतिक दृष्टिदान दिनाचे औचित्य साधून येथील श्रमिक पत्रकार संस्थेच्यावतीने पत्रकारांसाठी मोफत नेत्ररोग तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. डॉ. राहुड नेत्र हॉस्पिटल यांच्या सहकार्याने रविवार (दि. १४) सकाळी १० ते दुपारी १ पर्यंत पोपळे हॉस्पिटल, संगमनेर येथे हे शिबिर होणार आहे. निरोगी दृष्टी हीच जीवनाची खरी संपत्ती' या संदेशातून आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरात सहभागी पत्रकारांची डोळ्यांची तपासणी करण्यात येणार असून विविध नेत्रविकारांबाबत तज्ज्ञ डॉक्टरांकडून मार्गदर्शन केले जाणार आहे. तसेच दृष्टी संरक्षण, दृष्टिदानाचे महत्त्व आणि जनजागृती याबाबतही माहिती देण्यात येणार आहे.

शिबिरादरम्यान मोतीबिंदू शस्त्रक्रिया किंवा अन्य मोठ्या तपासण्या व उपचारांची आवश्यकता असल्यास संबंधित रुग्णांना ५० टक्के सवलतीचा लाभदेण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली. पत्रकारांच्या आरोग्याची काळजी घेण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत असून परिसरातील सर्व पत्रकारांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्रमिक पत्रकार संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे. या शिबिरासाठी इच्छुकांनी पूर्वनोंदणी करणे आवश्यक असून संघाच्या पदाधिकाऱ्यांशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

श्रमिक पत्रकार संस्थेच्या या उपक्रमामुळे पत्रकारांना दर्जेदार नेत्रसेवा उपलब्ध होण्यास मदत होणार असून दृष्टिदान आणि नेत्रआरोग्याबाबत जनजागृतीसही चालना मिळणार आहे.

# आदिवासी भागात गॅस वितरणासाठीची अट शिथिल करा - आ. डॉ. किरण लहामटे

युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले तालुक्यातील दुर्गम आदिवासी भागात एलपीजी गॅस ग्राहकांना सिलेंडर मिळवण्यासाठी तांत्रिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. या अडचणींची दखल घेत आमदार डॉ. किरण लहामटे यांनी राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांना निवेदन दिले असून, आदिवासी भागासाठी डॅक कोडची अट शिथिल करण्याची मागणी केली आहे.



अकोले हा दुर्गम आदिवासी भाग असून येथे मोबाईल नेटवर्कची मोठी समस्या आहे. अनेक नागरिक मोबाईल रिचार्ज करत नसल्याने गॅस वितरणावेळी आवश्यक असलेला डॅक कोड त्यांना प्राप्त होत नाही. तालुक्यात अतिवृष्टी होत असल्याने मोबाईल टॉवर व त्यातच वीजपुरवठा वारंवार खंडित होतो. यामुळे डॅक कोड मिळवणे अधिकच जिकिरीचे होते. या समस्येवर तोडगा म्हणून इगतपुरी, त्र्यंबकेश्वर आणि हरसूल या दुर्गम भागांच्या धर्तीवर अकोले मतदारसंघातील सर्व गॅस वितरकांना २० ते ३० टक्के डिलिव्हरी डॅक कोडशिवाय करण्याची मुभा देण्यात यावी, अशी प्रमुख मागणी आमदार डॉ. लहामटे यांनी केली आहे.

यासोबतच गॅस सिलेंडर बुकिंगचा सध्याचा ४५ दिवसांचा कालावधी कमी करून तो २५ दिवसांवर आणावा. अन्यथा इंधनासाठी लाकूडफाट्याचा वापर वाढून मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड होण्याची भीती निवेदनात व्यक्त करण्यात आली आहे. तसेच, आधार कार्ड वेळेत ऑनलाइन अपडेट न झाल्यामुळे अनेक उज्ज्वला गॅस ग्राहकांचे दोन वेगवेगळे आधार क्रमांक तयार झाले आहेत.

त्यामुळे त्यांची ई-केवायसी प्रक्रिया रखडली आहे. ही तांत्रिक अडचण तातडीने सोडवण्यासाठी नवीन आधार क्रमांक गॅस कंपनीच्या सॉफ्टवेअरमध्ये समाविष्ट करण्याची सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी आग्रही मागणी आ. डॉ. लहामटे यांनी मंत्री भुजबळ यांच्याकडे केली आहे.


**पाहिजेत**

**दुकान कामासाठी पुर्णवेळ माणसे पाहिजेत**

**मुले - ४**

थकबाकी पगार दिला जाईल

**9881155177**

**पाहिजेत**

**माऊली ग्रीन सोल्युशन येथे कामासाठी मुले पाहिजेत**

**सोलर, सीसीटिव्ही, संगणक सिस्टीममध्ये तांत्रिकज्ञान आवश्यक**

**7588095215**

**7888095215**

दैनिक युवावार्ता परिवर्तनाचा पुरस्कर्ता


# राजूर येथे अप्पर तहसील कार्यालय सुरु होणार

युवावार्ता (प्रतिनिधी)

राजूर - प्रतिनिधी अकोले तालुक्यातील सहा महसूल मंडळांसाठी राजूर येथे प्रस्तावित अप्पर तहसील कार्यालय सुरू होणार आहे. शासन पातळीवरून याबाबत प्रक्रिया सुरू झाली असून १५ ऑगस्ट पूर्वी हे कार्यालय सुरू करण्याबाबत आमदार डॉ. किरण लहामटे प्रयत्नशील आहेत. यामुळे कोर्टानंतर आता अप्पर तहसील कार्यालय राजूर येथे सुरू होणार आहे. गुरुवारी अखेर शासनाने जिल्ह्यातील इतर ठिकाणांबरोबर राजूर येथेही अप्पर तहसील कार्यालय सुरू करण्याबाबत हिरवा कंदील दाखवला. यामुळे या सहा महसूल मंडळांतील १०६ गावांना आता आपल्या महसुली कामासाठीचा मोठा हेलपाटा वाचणार आहे. तालुक्यातील राजूर येथे अतिरिक्त कार्यालयाला या पूर्वीच मंजुरी मिळालेली आहे. या अतिरिक्त तहसील कार्यालयाबाबत १५ दिवसांची जाहीर सूचना प्रसिद्ध करून हरकती व सूचना मागविण्याबाबत संबंधिताना निर्देश देण्यात आले आहेत. राजूर, साकीरवाडी, वाकी, शेंडी, कोतूळ, खिरविरे या सहा महसूल मंडळातील ७७

ग्रामपंचायतीमधील १०४ महसुली गावांचा राजूर अप्पर तहसील कार्यालयात समावेश करण्यात आला आहे. राजुरला अप्पर तहसील सुरू होत असल्यामुळे आदिवासी भागातील लोकांची वेळेची आणि आर्थिक बचत होणार आहे

## शेख बशीर हुसेन जहाँगीरदार यांचे निधन



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - राहूरी येथील जुन्या काळातील प्रसिद्ध चिकू व्यवसायिक शेख बशीर हुसेन जहाँगीरदार यांचे अल्पशा आजाराने दू:खद निधन झाले.त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा समाजसेवक शेख साबीर बशीर जहाँगीरदार तीन मुली, नातवंडे असा मोठा परिवार आहे.मृत्यु समयी त्यांचे वय ७४ होते.अंत्यविधीत शहर व जिल्ह्यातील समाजातील सर्व प्रतिष्ठीत नागरिक हजर होते. दैनिक युवावार्ता परिवाराच्यावतीने भावपूर्ण श्रद्धांजली.

# कृत्रिम पावसासाठी 'प्रकल्प वर्षा' पुन्हा सुरु करा

## शासनाकडे भारतीय जनसंसदेची मागणी

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संभाव्य दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर 'प्रकल्प वर्षा' राबवुन कृत्रिम पाऊस पाडावा अशी मागणी माजी पंचायत समिती तथा भारतीय जनसंसदचे जिल्हाध्यक्ष श्री .सुधीर भद्रे यांनी शासनाकडे केली आहे . महाराष्ट्रामधे यावर्षी कमी पावसाची शक्यता विविध हवामान तज्ज्ञ, हवामान अभ्यासक आणि हवामानविषयक संस्थांकडून व्यक्त करण्यात येत आहे. जुनच्या मध्यापर्यंत पावसाची हजेरी अद्याप लागलेली नाही . त्यामुळे संभाव्य दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाने सन २००५ मध्ये बंद केलेला प्रकल्प वर्षा पुन्हा सुरू करून राज्यात कृत्रिम पाऊस (Cloud seeding) कार्यक्रम राबवावा .कृत्रिम पाऊस म्हणजे वातावरणातील उपलब्ध पावसाळी ढगांमध्ये विशिष्ट पदार्थांची फवारणी करून पाऊस पडण्यास अनुकूल परिस्थिती निर्माण करण्याची वैज्ञानिक प्रक्रिया होय. भारतातील विविध राज्यांनी याचा वापर केला आहे . विशेषत: आंध्र प्रदेशने हायग्रोस्कोपिक (Hygroscopic cloud seeding ) तंत्रज्ञानाचा वापर करून सकारात्मक परिणाम मिळाले आहेत.

कृत्रिम पाऊस प्रकल्पासाठी काही कोटी रुपयांचा खर्च येऊ शकतो. मात्र दुष्काळ पडल्यास शासनाला माणसांना पिण्याच्या पाण्यासाठी टँकर व्यवस्था, जनावरांसाठी पाणी आणि चारा छावण्या, मजुरांना रोजगार हमी योजनेची कामे, जलटंचाई निवारण उपाययोजना तसेच विविध प्रशासकीय खर्चांवर शेकडो कोटी रुपये खर्च करावे लागतात. त्या ऐवजी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून कृत्रिम पाऊस प्रकल्प राबविणे अधिक फायदेशीर ठरेल .

याशिवाय दुष्काळी परिस्थितीत निर्माण होणारी पाणीटंचाई, जनावरांच्या चाऱ्याची समस्या, रोजगार हमी योजनांवरील वाढता ताण आणि काही ठिकाणी होणाऱ्या गैरव्यवहारांना आळा घालण्यासाठीही कृत्रिम पाऊस हा प्रभावी पर्याय ठरू शकतो.

यासाठी महाराष्ट्र शासनाने तातडीने प्रकल्प वर्षा पुनरुज्जीवित करून आवश्यक रडार, विमाने, हवामान निरीक्षण यंत्रणा आणि क्लाऊड सीडिंगसाठी लागणारी संपूर्ण यंत्रणा तातडीने उभारून कृत्रिम पाऊस पाडावा आणि शेतकरी आणि सामान्य जनतेला धीर द्यावा अशी मागणी भारतीय जनसंसदचे राज्य निमंत्रक अशोक सब्बन, सरपंच कैलास पठारे, युवानेते अशोक ढगेवीर बहादुर प्रजापती, सुनील टाक, परदेशी, भगवान जगताप, भोसले, पोपटराव साठे व जिल्हाध्यक्ष सुधीर भद्रे यांनी मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे लेखी पत्राद्वारे केली आहे .

# कृषी कन्यांकडून खांजापूर येथे जागतिक पर्यावरण दिन साजरा

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- जागतिक पर्यावरण दिनानिमित्त खांजापूर येथे ग्रामीण कृषी कार्यानुभव कार्यक्रमातील श्रमशक्ती कृषी महाविद्यालय मालदाडच्या विद्यार्थीनी स्वामिनी सुर्यवंशी, सानिका देठे, पुजा नवले, संस्कृती सातपुते, वासंती थिटे, सृष्टी शेवाळे यांनी ग्रामस्थांच्या सहकार्याने वृक्षारोपण व पर्यावरण जनजागृती कार्यक्रम आयोजित केला. कार्यक्रमात विद्यार्थिनींनी पर्यावरण संरक्षणाचे महत्त्व सांगून गावातील नागरिकांना अधिकाधिक झाडे लावण्याचे व त्याचे संवर्धन करण्याचे आवाहन केले. या वेळी विद्यार्थिनींनी ग्रामपंचायत - खांजापूर येथे वृक्षारोप भेट देऊन वृक्षलागवडीस प्रोत्साहन दिले. यावेळी उपस्थित ग्रामसेवक



श्रीमती वायकर मॅडम, ग्रामपंचायत कर्मचारी श्री. भगवान साळवे आणि ग्रामस्थ उपस्थित होते. ग्रामस्थांनी या कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवत विद्यार्थिनींच्या कार्याचे कौतुक केले. पर्यावरण संतुलन राखण्यासाठी प्रत्येकाने आपली जबाबदारी ओळखून निसर्ग संवर्धनासाठी योगदान द्यावे, असा संदेश कार्यक्रमातून देण्यात आला. या उपक्रमासाठी सेवासंस्कार संस्था अंतर्गत कार्यरत असलेल्या श्रमशक्ती कृषी महाविद्यालय मालदाड संस्थेचे अध्यक्ष साहेबराव नवले पाटील यांच्या प्रेरणेने तसेच महाविद्यालय प्राचार्य डॉ. गणेश साकोरे यांच्या आणि प्रा. निलेश तायडे व कार्यक्रम अधिकारी प्रा. ए. डी. गुंजाळ आणि सर्व विशेषतज्ज्ञ यांचे मार्गदर्शन लाभत आहे.

# शरद पवार गट काँग्रेसमध्ये विलीन होण्याच्या घडामोडींना वेग ?



मुंबई (वृत्तसंस्था)

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून विलिनीकरणासंदर्भातील कोणताही प्रस्ताव काँग्रेस पक्षाला देण्यात आलेला नाही, असे स्पष्टीकरण शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी दिले आहे. काँग्रेसकडून देखील तसा कोणताही प्रस्ताव आलेला नाही, असे शशिकांत शिंदे यांनी एबीपी माझाला फोनवरुन सांगितले. प्रस्ताव जर आला असता तर नक्कीच वरिष्ठ नेतृत्वाकडून आम्हाला त्याबाबत कल्पना देण्यात आली असती, असेही शशिकांत शिंदे यांनी म्हटले.

काल सकाळी शरद पवार यांच्या उपस्थितीत सिल्वर ओक या निवासस्थानी पक्षाची बैठक झाली. या बैठकीमध्येसुद्धा काँग्रेसमध्ये विलीन होण्याच्या कोणत्याही प्रस्तावावर शरद पवार यांची आमच्यासोबत चर्चा नाही. अशा प्रस्तावाच्या संदर्भात माझ्यापर्यंत अशी कोणतीही माहिती आलेली नाही. त्यामुळे समोर आलेल्या बातमीमध्ये तथ्य नाही, अशी माहिती प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी दिली.

गेल्या दोन दिवसांपासून राष्ट्रवादीच्या विलिनीकरणाची चर्चा सुरु आहे. सर्वच डाव्या विचारांच्या पक्षांनी संविधान वाचवण्यासाठी एकत्र येणे काळाची गरज आहे. त्याबाबत कोणाचंही दुमत नाही. पण काँग्रेस पक्षाने राष्ट्रवादीला विलिनिकरणाचा प्रस्ताव दिला आहे, अशी चर्चा आहे, तसा कोणताही प्रस्ताव आमच्याकडे आला नाही. जेव्हा प्रस्ताव येईल, तेव्हा वरिष्ठ चर्चा करतील. काँग्रेसची इतर पक्षांबाबतची भूमिका काय आहे, याचा विचार केला जाईल. अलीकडच्या काळातील दोन-तीन विधानसभा निवडणुकांमुळे सर्वच पक्षाच्या नेत्यांना शहाणपण सुचले आहे. राहुल गांधी असोत किंवा ममता बॅनर्जी असतील किंवा आणखी कोणी असतील, सगळेच तावून सुलाखून निघाले आहेत. पण देशातील संविधान वाचवायचं असेल आणि सत्ताधाऱ्यांवर अंकूश ठेवायचा असेल तर डाव्या विचाराच्या पक्षांनी एकत्र आले पाहिजे, असे राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते अंकुश काकडे यांनी सांगितले.नाना पटोले यांनी दिल्लीला रवाना होण्यापूर्वी विमानतळावर प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. त्यावेळी पटोले यांनी म्हटले की, राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलीनीकरणाचा प्रस्ताव ऑलरेडी पवार साहेबांनी दिला होता. मात्र, काही कारणास्तव त्यावर निर्णय घेण्यास उशीर झाला. आता देशातील राजकारणात जे काही चाललं आहे, देशाची संविधानिक व्यवस्था संपत चालली आहे.


Happy Birthday



**राजेंद्र अभंग**

संचालक, सुरभी सुपरशॉपी



**विलास बेलापूरकर**

उद्योजक




**रघुनाथ खरात**

सामाजिक कार्यकर्ते

शुभेच्छुक - दैनिक युवावार्ता


# समाज सुधारक पूजनीय साने गुरुजी

आज साने गुरुजी यांची पुण्यतिथी आहे. गुरूजी हा शब्द त्यांनी खरा करून दाखवला. आनंददायी शिक्षण म्हणजे काय हे त्यांनी स्वतः विद्यार्थी वर्गाला शिकवून दाखवले. करील मनोरंजन जो मुलांचे जडेल नाते प्रभूशी तयाचे हे त्यांचे शब्द आजही खरे आहेत. साने गुरुजी हे १९४६ मध्ये संगमनेरला आले होते. हे अनेकांना माहीत नाही. एका राजकीय परिषदेसाठी ते आले होते. त्या वेळी श्रीकृष्ण गंधे, म्हणजे माझे वडील (मोठे गंधे सर) यांनी कुमार साहित्य संमेलन आयोजित केले होते. साने गुरूजी मोठ्या आनंदाने त्या संमेलनाला आले. राज्यातील बहुतेक हे पहिले बालसाहित्य संमेलन असावे. साने गुरुजींचा मोठा प्रभाव वडीलांवर पडला होता. आनंददायी शिक्षणाची संकल्पना गंधे सरांनी त्या काळात पेटिट हायस्कूलमध्ये राबवली. साने गुरूजींच्या आदर्श घेऊन माझे वडिल शेवट पर्यंत विद्यार्थी सेवा करत राहिले. विद्यार्थी देवो भव हे त्यांच्या आयुष्याणचे ध्येय होते. माझे वडीलांचा प्रवास हा पांडुरंग सदाशिव साने ते पांडुरंग शास्त्री आठवले असा झाला. आज मी हे का लिहिले आहे तर आज पूजनीय सानेगुरुजी यांची पुण्यतिथी आहे. साने गुरुजी यांचा जन्म हा २४ डिसेंबर१८९९ रोजी झाला. त्यांच्या आईने त्यांच्यावर विविध संस्कार केले. त्यातूनच त्यांचा जीवन प्रवास झाला. स्वावलंबन, सेवावृत्ती त्यांचे अंगी होती. विद्यार्थी हे मासिक त्यांनी सुरू केले. महात्मा गांधी यांच्या विचारांचा प्रभाव त्यांच्यावर होता. राष्ट्रसेवादलाची स्थापना



त्यांनी केली. आपल्या पत्री या काव्यसंग्रहातून देशभक्ती पर कविता प्रसिद्ध आहे. बलसागर भारत होवो ही प्रसिद्ध कविता आजही आपण म्हणतो. जातीभेद अस्पृश्यता या अनिष्ट रूढी परंपरा यांना साने गुरुजींनी कायमच विरोध केला. पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात हरिजनांना प्रवेश मिळावा म्हणून त्यांनी उपोषण केले. त्यामध्ये त्यांना यश मिळाले त्यामुळे एका पांडुरंगाने दुसऱ्या पांडुरंगाला खऱ्या अर्थाने मुक्त केले असे म्हटले गेले. १९४८ साली त्यांनी साधना साप्ताहिक सुरू केले. मानवतावाद, सामाजिक सुधारणा, देशभक्ती हे त्यांच्या साहित्यामधून दिसते. त्यांची एकूण जवळजवळ ७३ पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. श्यामची आई ही प्रसिद्ध कादंबरी त्यांनी नाशिकमधील तुरुंगात असताना लिहिली. करील मनोरंजन जो मुलांचे जडेल नाते प्रभूशी तयाचे असे हे त्यांच्या जीवनाचे सार होते. मनोरंजनातून संस्कार, आनंददायी शिक्षण हे प्रत्यक्ष साने गुरुजींनी करून दाखवले. मोरी गाय हे पुस्तकही लिहिले. मातृ हृदयी गुरुजींनी आई-वडिलांच्या प्रेमावर मोलकरीण नावाची अप्रतिम कादंबरी लिहिली. खरा तो एकची धर्म जगाला प्रेम अर्पावे, ही कविता आजही शाळेत म्हटली जाते. ही कविता भारतीय संस्कृतीची द्योतक आहे. गुरुजी हा शब्द त्यांनी खरा करून दाखवला. आजच्या काळात शिक्षकांनी साने गुरुजींच्या विचारांचा आदर्श घ्यावा. आनंददायी शिक्षण म्हणजे काय हे त्यांच्या विचारातून समजून घ्यावे आणि हे शिक्षण कसे देता येईल याचा अभ्यास करावा. नूसता आनंददायी शनिवार म्हणून चालणार नाही, तर प्रत्यक्ष कृती मधून साने गुरुजींच्या विचारातून हे आपल्याला शक्य करून दाखवता येईल. याचाही अभ्यास आज होणे आवश्यक आहे. साने गुरुजींचे विचार त्यांचा जीवन प्रवास हा शब्दात पकडणे अशक्य आहे आणि माझ्यासारख्याला ते शक्यही नाही. परंतु मी जे काही साने गुरुजी बद्दल माझे बोबडे बोल बोललो आहे ते आपण समजून घ्यावे. साने गुरुजी यांना शतशः नमन शतशः नमन. साने गुरुजींच्या पुण्यतिथीनिमित्त हा शब्द प्रपंच.

**प्रा. शशांक गंधे**

**संगमनेर, जि. अहिल्यानगर**

**मोबा.९८९०१६३६४२**

## संपादकीय...

# मान्सूनची प्रतिक्षा आणि शेतीचे बदलते गणित

भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा मानला जाणारा शेतकरी आजही मोठ्या प्रमाणावर निसर्गावर अवलंबून आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या युगात अनेक क्षेत्रांनी झपाट्याने प्रगती केली असली, तरी शेतीचे भवितव्य अजूनही पावसाच्या थेंबांशी जोडलेले आहे. विशेषतः महाराष्ट्रासारख्या राज्यात खरीप हंगामाची सुरुवात ही मान्सूनच्या आगमनाशी निगडित असते. जून महिना सुरू होताच शेतकऱ्यांच्या नजरा आकाशाकडे लागतात. पाऊस वेळेवर येईल का, किती पडेल आणि किती दिवस टिकेल, या प्रश्नांवरच पुढील काही महिन्यांचे नियोजन अवलंबून असते. यंदाच्या खरीप हंगामातही हीच परिस्थिती दिसून येत आहे. हवामान बदलामुळे मान्सूनचे स्वरूप अधिकाधिक अनिश्चित होत चालले आहे. काही भागांत अतिवृष्टी तर काही ठिकाणी दीर्घकाळ पावसाचा खंड, असे टोकाचे चित्र आता नेहमीचे झाले आहे. त्यामुळे पाऊस सुरू झाला म्हणजे लगेच पेरणी करणे हा शहाणपणाचा निर्णय ठरत नाही. जमिनीत पुरेसा ओलावा निर्माण झाला आहे का, पावसाची सातत्यता आहे का, याचा विचार करूनच पेरणीचा निर्णय घेणे आवश्यक ठरते. अन्यथा दुबार पेरणीची वेळ येऊन शेतकऱ्यांवरील आर्थिक भार वाढू शकतो.

महाराष्ट्रातील सोयाबीन, कापूस, तूर, मका, मूग, उडीद, भात आणि बाजरी यांसारखी खरीप पिके पावसावर मोठ्या प्रमाणात अवलंबून आहेत. विविध विभागांतील भौगोलिक परिस्थिती, जमिनीचा प्रकार आणि पर्जन्यमान यांमध्ये मोठी विविधता असल्याने पेरणीचा कालावधीही वेगवेगळा असतो. अशा परिस्थितीत स्थानिक हवामानाचा अभ्यास आणि कृषी तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाचा आधार घेणे अधिक महत्त्वाचे ठरते. हवामान बदलाचे परिणाम केवळ पावसापुरते मर्यादित राहिलेले नाहीत. तापमानवाढ, अवेळी पाऊस, गारपीट, दुष्काळ आणि अतिवृष्टी यामुळे शेतीमालाच्या उत्पादनावर गंभीर परिणाम होत आहे. रोग आणि किडींचा प्रादुर्भाव वाढत असून उत्पादन खर्चही सातत्याने वाढत आहे. परिणामी शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती अधिकच अस्थिर होत आहे. या पार्श्वभूमीवर हवामानाशी सुसंगत आणि शाश्वत शेती व्यवस्थापन विकसित करणे ही काळाची गरज बनली आहे. आज हवामान अंदाज आणि कृषी नियोजन यांचा परस्परसंबंध अधिक दृढ झाला आहे. भारतीय हवामान विभाग, कृषी विद्यापीठे आणि कृषी विज्ञान केंद्रे विविध माध्यमांतून शेतकऱ्यांना मार्गदर्शन करीत आहेत. मोबाईल ॲप्स, संदेश सेवा आणि डिजिटल तंत्रज्ञानामुळे हवामानविषयक माहिती सहज उपलब्ध झाली आहे. मात्र, माहिती उपलब्ध असणे आणि तिचा योग्य वापर करणे यात फरक आहे. वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारून त्या माहितीच्या आधारे निर्णय घेणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या वाढविणे आवश्यक आहे. पेरणीपूर्व नियोजनामध्ये जमिनीची मशागत, मृदसंधारण आणि जलव्यवस्थापन या बाबींना विशेष महत्त्व आहे. उन्हाळी खोल नांगरट, बांधबंदिस्ती, चर खोदणे आणि शेततळी तयार करणे यामुळे पावसाचे पाणी जमिनीत मुरण्यास मदत होते. भविष्यातील पाणीटंचाई लक्षात घेता पावसाच्या प्रत्येक थेंबाचे संवर्धन करण्याची मानसिकता विकसित करणे अत्यंत गरजेचे आहे. ठिबक आणि तुषार सिंचनासारख्या आधुनिक पद्धतींमुळे पाण्याची बचत होण्याबरोबरच उत्पादनक्षमताही वाढू शकते. बियाण्यांची निवड आणि मृदा परीक्षण या दोन बाबी आधुनिक शेतीतील यशाचे आधारस्तंभ मानल्या जातात. स्थानिक परिस्थितीला अनुरूप, सुधारित आणि रोगप्रतिकारक वाणांचा वापर केल्यास उत्पादनात वाढ होऊ शकते. त्याचबरोबर मृदा परीक्षणाच्या आधारे खतांचा संतुलित वापर केल्यास खर्च कमी होतो आणि जमिनीचे आरोग्य टिकून राहते. अनेकदा अंदाजाने वापरल्या जाणाऱ्या खतांमुळे आर्थिक नुकसान होते, हे वास्तव दुर्लक्षित करता येणार नाही.

# संतांची शिकवण ही समाजाला दिशा देणारी; निलम खताळ

## दत्त महाराज व सदगुरू नारायण महाराज मंदिर उभारण्याचे काम सुरु




संगमनेर - संतांची शिकवण ही समाजाला दिशा देणारी आहे. अध्यात्मातून समाज एकत्र येतो आणि संस्कार टिकून राहतात. सदगुरु नारायण महाराज आश्रमातून सुरू असलेले कार्य हे समाजप्रबोधनाचे केंद्र बनत आहे. भविष्यात उभारण्यात येणारे दत्त महाराज मंदिर आणि सद्गुरू नारायण महाराज मंदिर हे हजारो भाविकांसाठी श्रद्धास्थान ठरेल. या माध्यमातून वारकरी परंपरा आणि संत विचार अधिक बळकट होतील, असे प्रतिपादन संगमनेरचे आमदार अमोल खताळ पाटील यांच्या पत्नी निलम अमोल खताळ यांनी केले.

संगमनेर तालुक्यातील गुंजाळवाडी येथील निमर्ल नगर परिसरात असलेल्या विश्वचैतन्य परम पूज्य सद्गुरू नारायण (आण्णा) महाराज आश्रमात आयोजित साप्ताहिक आरती कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी त्यांच्या हस्ते महाआरती संपन्न झाली. आश्रम परिसरात टाळ-मृदंगाच्या गजरात हरिनामाचा जयघोष सुरू होता. भाविकांनी मोठ्या भक्तिभावाने आरती, नामस्मरण आणि भजनामध्ये सहभाग घेतला.

त्या पुढे म्हणाल्या की, खताळ कुटुंब हे सर्वसामान्य शेतकरी आणि वारकरी संप्रदायाशी नाळ जोडलेले कुटुंब आहे. लहानपणापासूनच घरामध्ये भजन, कीर्तन, नामस्मरण आणि संत साहित्याचे संस्कार मिळाले. अनेकदा आमदार अमोल खताळ पाटील यांच्यासमवेत श्री क्षेत्र नारायणपूर येथे विश्वचैतन्य परम पूज्य सद्गुरू नारायण (आण्णा) महाराज यांचे दर्शन घेण्याचा योग येतो. महाराष्ट्राची पायाभरणी ही संतांच्या विचारशैलीवर उभारलेली आहे. संतांनी समाजाला समता, बंधुता, सेवा आणि अध्यात्माचा संदेश दिला. आजच्या धकाधकीच्या जीवनात युवकांनी संतांच्या विचारांचा आदर्श घेतल्यास समाजात सकारात्मक परिवर्तन घडू शकते.

यावेळी रविंद्र उर्फ बापू देशमुख यांनी सांगितले की, विश्वचैतन्य परम पूज्य सद्गुरू नारायण (आण्णा) महाराज यांच्या कृपाआशीर्वादाने आणि परम पूज्य सद्गुरू टेंभे स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली आश्रमामध्ये सातत्याने अध्यात्मिक आणि समाजप्रबोधनाचे उपक्रम राबविण्यात येत आहेत. याच पवित्र ठिकाणी दत्त महाराज मंदिर आणि सदगुरू नारायण महाराज मंदिर उभारण्याचे काम सुरु आहे.

कार्यक्रमास सुवर्णा संदीप खताळ, शितल राहूल खताळ तसेच रविंद्र उर्फ बापू देशमुख यांच्यासह परिसरातील अनेक महिला, युवक आणि वारकरी भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. साप्ताहिक आरती, हरिनाम सप्ताह आणि भजन कार्यक्रमामुळे आश्रम परिसर भक्ती, श्रद्धा आणि अध्यात्मिक ऊर्जेने भारावून गेला होता. कार्यक्रमानंतर उपस्थित भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

# जिल्ह्यातील शासकीय शाळांमध्ये...

पान २ वरून -

भावनिक अंतर कमी होत असल्याचे निरीक्षण नोंदवले. या चर्चासत्राचे सूत्रसंचालन नोमोबोचे संस्थापक व द ओपनट्री फाउंडेशनचे विश्वस्त देवेंद्र नाईक यांनी केले.

येत्या काळात द ओपनट्री फाउंडेशन जिल्हा प्रशासनासोबत काम करून आपला उपक्रम जिल्ह्यातील सर्व १४ तालुक्यांमधील शाळांपर्यंत विस्तार करणार आहे. शाळांना क्रीडा साहित्य उपलब्ध करून देणे, शिक्षकांना प्रशिक्षण देणे आणि अहिल्यानगरला क्रीडा-एकात्मिक शिक्षणासाठी महाराष्ट्रातील आदर्श जिल्हा बनविणे, हे या उपक्रमाचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. या परिषदेस महानगरपालिकेचे शिक्षणाधिकारी जुबेर पठाण, महिला व बाल विकास समितीच्या उपाध्यक्षा वर्षा सानप, विस्तार अधिकारी पोपटराव धामणे यांच्यासह गट शिक्षणाधिकारी, मुख्याध्यापक व शिक्षक उपस्थित होते. गेल्या २१ वर्षांपासून कार्यरत असलेल्या द ओपनट्री फाउंडेशन आणि अहिल्यानगरमधील स्नेहालय यांच्या २०१३ पासूनच्या सहकार्यामुळे राज्यातील १२ जिल्ह्यांमधील १० लाख मुले, १० हजार शिक्षक व ९०० शासकीय शाळांपर्यंत खेळाधारित शिक्षणाचा विचार पोहोचला आहे.


**महाराष्ट्र शासन**

सत्यमेव जयते

**वनविभाग अहिल्यानगर प्रा.**

dcfanagar@gmail.com

**ई-निविदा सुचना क्र. ०१ सन २०२६ - २७**

उपवनसंरक्षक, अहिल्यानगर प्रा. वनभवन, अहिल्यानगर - छत्रपती संभाजी नगर रोड, अहिल्यानगर-४१४००१, दूरध्वनी क्रमांक - ०२४१ - २३२६१४२ हे योग्य त्या नोंदणीकृत खुल्या वर्गातील कंत्राटदार खालील कामांकरीता बी-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीव्दारे (Online Tenders) मागवित आहेत.

वरील निविदा सुचनेत अहिल्यानगर वनविभागातील खालील काम

| अ.क्रं | कामाचे नांव / स्थळ | अंदाजपत्रकिय / बिओक्यू रक्कम |
|---|---|---|
| 1 | Providing and fixing chain link fencing 1.65 m high with gate (Main gate and wicket gate 1 No.each) around plantation (4 hect.) at Dongaon in Suvey No 54, Gat no 109, in Karjat (T) Range Tal. Karjat Dist. Ahilyanagar in Ahilyanagar Forest | 1283657 /- |

प्रसिध्दीसाठी दिनांक - १५/०६/२०२६ ते २२/०६/२०२६ या कालावधीत डाऊनलोडींगसाठी खालील संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.

**http://mahatenders.gov.in**
Document Tender Fee and EMD to be paid via online payment Gateway mode only.
The information of e-Payment Gateway available on e-Tendering website.

जिमाका / नगर / जाहि / ३४ /२०२६

( धर्मवीर सालविठ्ठल) भा.व.से
उपवनसंरक्षक, अहिल्यानगर.



DRSGWF's

**Vrindawan Homoeopathic Medical College & Hospital**

(MHF's Homoeopathic Medical College and Hospital)
Chandanapuri Ghat, Sangamner, Dist.-Ahilyanagar, Maharashtra
Email- mhfhmc@gmail.com Phone- 9922382566, 9822314520.
(AFFILIATED TO M.U.H.S., NASHIK & NCH NEW DELHI)

**WALK IN INTERVIEW**

Application are invited from the Eligible Candidates for the following posts

| Sr. No | Type of Post | Vacant Post |
|---|---|---|
| | Principal | 01 (Open) |

| Sr. No | Dept./Subject | Vacant Post: Professor | Associate Professor (Reader) | Assistant Professor (Lecturer) |
|---|---|---|---|---|
| | Anatomy | 01 (Open) | | 01 (Open) |
| | Physiology Including Biochemistry | 01 (Open) | | |
| | Organon of Medicine | | 01 (Open) | 01 (Open) |
| | Homoeopathic Pharmacy | 01 (Open) | | |
| | Pathology & Microbiology | 01 (Open) | | |
| | Forensic Medicine and Toxicology | 01 (Open) | | |
| | Practice of Medicine | 01 (Open) | 01 (Open) | |
| | Surgery | 01 (Open) | | |
| | Obstetrician & Gynecology | 01 (Open) | | |
| | Community Medicine | 01 (Open) | | 01 (Open) |

* Till the end of lien period Additional Post

Candidates holding Essential Qualifications & Experience as per Rules & Regulations of NCH- New Delhi & MUHS- Nashik will be eligible to apply.
The applicants are to submit their application within 15 days by email mentioned above.

Secretary


## जाहीर नोटीस

**तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,**

**मिळकतीचे वर्णनः-**
जिल्हा- अहिल्यानगर, ता. संगमनेर, पैकी मौजे सुकेवाडी येथील ग्रामपंचायत हददीतील स.नं. १५४/१, १५४/२, १५५/१, १५५/२, १५६/८ व संगमनेर नगरपालिका हद्दीतील सर्व्हे नं. १७९/१३ सदरील उताऱ्यांचे
**संपूर्ण क्षेत्र,**
यासी चतुः सिमा गावचे रेकॉर्ड ऑफ राईटनुसार, येणेप्रमाणे मिळकत तदंगभुत वस्तुसह.

वर वर्णन केलेली मिळकती हया अभिजीत अरुण सराफ, अमोद अरुण सराफ यांच्या अविभक्त मालकीच्या आहेत. सदरच्या मिळकतीत आमचे अशिलाचा हिस्सा असुन सदर मिळकतींचे कायदेशीर वाटप झालेले नाही. तरी सदर मिळकतीमध्ये आमचे अशिलाचा हिस्सा आहे सदर मिळकतीचे कायदेशीर रित्या वाटप झाल्याशिवाय सदर मिळकतीसंबंधाने कोणत्याही प्रकारचा, खरेदी, विक्री, करार, गहाण, दान, भाडेपटटा अगर हस्तांतर होईल असे कुठलाही व्यवहार करण्यात येवु नये. या पध्दतीने होणारे व्यवहार आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. जरी यदाकदाचित कुणी त्रयस्थांनी व्यवहार केल्यास आमचे अशिलास मा. न्यायालयात कायदेशीर कारवाई करण्याचा हक्क व अधिकार राहील. कळावे.

येणेप्रमाणे जाहिर नोटीस असे. ता. १२/०६/२०२६.

**ॲड. श्री. श्रीकांत राधाकिसन शिंदे**
वकील कॉलनी, संगमनेर, ता. संगमनेर, जि. अ.नगर
मो. नं. ९१४२००४९४९, ९७६६७८४९४९

**CHANGE IN NAME**

I HAVE CHANGED MY OLD NAME
SHIVCHARAN NAMDEO DAMODAR

TO NEW NAME
SHIVACHARAN NAMDEV DAMODAR

BY AFFIDAVIT NO 930/2026
DATE 11/06/2026

ADD- S.NO.140/140,LAXMI NAGAR,GUNJALWADI SANGAMNER -422605


**पाहिजेत**

मौजे सावरगाव घुले ता. संगमनेर येथे शेतात विहिर खोदण्यासाठी लाँग बुमचे फोकलॅन मशिन पाहिजे

(सोबत बंद लिफाफ्यात दरपत्रक देणे, योग्य दरपत्रकास काम देण्यात येईल)

- संपर्क -
श्री. राघू सावळेराम जाधव मु. पो. वरूडी पठार, ता. संगमनेर,जि. अ.नगर
मो. ९३७३९६७३६७

**पाहिजेत**

सार्थक ॲग्रोव्हेट या नामांकित कंपनी करिता
टेलीकॉलर महिला - २
ड्रायव्हर - २
नाशिक पुणे हायवे, छत्रपती चौक, घुलेवाडी, संगमनेर
९५५२५०६३६३

**पाहिजेत**

आत्मशांती टी सेंटर (सपट चहा)साठी जागा भरणे आहे.
हेल्पर - ०२
ड्रायव्हर - ०१
सेल्समन - ०१
संपर्क- नेहरु चौक, संगमनेर
9922113534
9730468090

**भाड्याने देणे आहे**

संगमनेर शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी
२००० स्क्वेअर फिट ३ मजले, एकूण ६००० स्क्वेअर फिट बांधकाम असलेली प्रशस्त इमारत भाड्याने देणे आहे
- पिण्यासाठी नगरपालिकेचे नळ कनेक्शन
- वापरासाठी स्वतंत्र बोरिंग सुविधा
- थ्री फेज लाईट कनेक्शन उपलब्ध
- व्यवसाय, ऑफिस, क्लासेस, हॉस्पिटल, इत्यादींसाठी उत्तम जागा

पत्ता : नाशिक – पुणे हायवे, सह्याद्री कॉलेजच्या पाठीमागे, संगमनेर, ता. संगमनेर , जि. अ.नगर
- संपर्क -
9822258458

**घर विक्रीसाठी आहे**

अकोले-नाशिक बायपास रोड डेरे इंग्लीश शाळेजवळ संगमनेर येथे १५०० चौ फूट उत्तरमुखी २० फुटी रोड टच सर्व सोईनेयुक्त टायटल क्लिअर घर विकणे आहे
आशा पवार
8999362929

**पाहिजेत**

स्पेशल सिक्युरिटी फोर्स व बाऊन्सर सर्विसेस
सिक्युरिटी गार्ड - ५
महिला - ३
सफाई कर्मचारी - ५
हेल्पर - ५
संपर्क - तिरंगा चौक, मालदाड रोड, संगमनेर
7709828846

**पाहिजेत**

श्री गणेश डिस्ट्रीब्यूटर श्री गणेश टायर्स या फॉर्मसाठी
सेल्समन -3
सुपर कॅरी ड्रायव्हर - 1
कामाचा अनुभव आवश्यक
9423793758

**हॉटेल अन्नपूर्णासाठी पाहिजेत**

स्वादिष्ट नाष्टा आणि जेवण नवायला कुक पाहिजे
आकर्षक पगार मिळेल
9011326117
7588004655

**पाहिजेत**

इथापे इन्स्टिटयूट करीता खालील पदे भरणे आहेत
अकाऊंटट –३
क्लार्क –३
ड्रायव्हर–३
वॉचमन– ३
तरी संबंधीतांनी आपल्या मुळ कागदपत्रांसह समक्ष भेटावे

**पाहिजेत**

डॉक्टर्स ०२- महिला (बी.ए.एम.एस/एम.डी.)
पंचकर्म थेरपिस्ट - ४ (स्त्री/पुरुष) ट्रेनिंग दिले जाईल
रिसेप्शनिस्ट - २ (महिला) कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक
ओ. टी. ॲसिस्टंट - १ (पुरूष)
माधवबाग क्लिनिक
९३२५०२८६८६








# खरात प्रकरणाचा खटला उज्ज्वल निकम लढणार

नाशिक (प्रतिनिधी)

अंधश्रद्धा, तंत्र-मंत्र आणि दैवी शक्तींच्या नावाखाली महिलांचे कथित लैंगिक शोषण केल्याच्या गाजलेल्या अशोक खरात प्रकरणात आता महत्त्वाची घडामोड घडली आहे. राज्यभर खळबळ उडवून देणाऱ्या या बहुचर्चित खटल्यात सरकारची बाजू भक्कमपणे मांडण्यासाठी ज्येष्ठ विधिज्ञ ड. उज्वल निकम यांची विशेष सरकारी वकील म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. राज्य शासनाने घेतलेल्या या निर्णयामुळे प्रकरणाच्या सुनावणीकडे सर्वांचे लक्ष लागले असून, तपास आणि न्यायालयीन प्रक्रियेला अधिक गती मिळण्याची शक्यता व्यक्त होत आहे. देशातील अनेक गाजलेल्या गुन्हेगारी खटल्यांमध्ये यशस्वी बाजू मांडणारे ड. निकम आता या प्रकरणात सरकारचे प्रतिनिधित्व करणार आहेत.

स्वतःला सिद्धपुरुष, अंकशास्त्रज्ञ आणि आध्यात्मिक मार्गदर्शक म्हणून सादर करणाऱ्या अशोक खरात याच्यावर अंधश्रद्धेचा आधार घेत महिलांची फसवणूक आणि लैंगिक शोषण केल्याचे गंभीर आरोप आहेत. पीडित महिलांनी दिलेल्या तक्रारींनंतर नाशिक पोलिसांनी खरातला अटक केली असून, प्रकरणाच्या गांभीर्यामुळे तपास विशेष तपास पथकाकडे सोपविण्यात आला आहे. तक्रारीनुसार, दैवी शक्तींची भीती दाखवून तसेच प्रसाद, पेढे किंवा पाण्यात गुंगीचे व अंमली पदार्थ मिसळून महिलांवर अत्याचार केल्याचा आरोप करण्यात आला आहे. विशेष तपास पथकाने अशोक खरातच्या कार्यालयासह फार्महाऊसवर छापेमारी करून सखोल तपास केला. या कारवाईदरम्यान पोलिसांच्या हाती अत्यंत धक्कादायक स्वरूपाचे पुरावे लागल्याचे समोर आले आहे.

# लिंगनिदान रॅकेटचा पर्दाफाश, आणखी डॉक्टर व एजंट अटकेत

## आरोपींची संख्या 21 वर

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - लोणी पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या अवैध गर्भलिंग निदान चाचणी व बेकायदेशीर गर्भपात प्रकरणाच्या तपासात दिवसेंदिवस धक्कादायक माहिती समोर येत असून पोलिसांनी आणखी एका डॉक्टरसह एजंटला अटक केली आहे. या कारवाईमुळे राज्यभर पसरलेल्या लिंगनिदान रॅकेटचे मोठे जाळे उघडकीस आले असून आतापर्यंत या गुन्ह्यात २१ आरोपींना अटक करण्यात आली आहे. विशेष म्हणजे त्यामध्ये ७ डॉक्टर, ३ मेडिकल चालक आणि वैद्यकीय साहित्याचा एक मोठा पुरवठादार यांचा समावेश आहे. सुरुवातीला या प्रकरणात नेवासा येथील डॉक्टर भणगे, दोन एजंट आणि सहा कुटुंबीय अशा नऊ जणांना अटक करण्यात आली होती. त्यांच्याकडून एक पोर्टेबल सोनोग्राफी मशीन आणि तीन चारचाकी वाहने जप्त करण्यात आली होती. त्यानंतर तपासाची व्याप्ती वाढत गेली आणि विविध जिल्ह्यांतील आरोपींचा सहभाग समोर येऊ लागला.

तपासादरम्यान आरोपी ढगे याच्याकडून आणखी एक पोर्टेबल सोनोग्राफी मशीन जप्त करण्यात आले. त्यानंतर श्रीरामपूर येथील डॉक्टर कुटे आणि डॉक्टर शेख यांना अवैध गर्भलिंग निदान चाचण्या व बेकायदेशीर गर्भपात केल्याप्रकरणी अटक करण्यात आली. पुढे पुण्यातील दोन डॉक्टर आणि वैद्यकीय साहित्य विक्री करणाऱ्या एका व्यक्तीला अटक करून पोलिसांनी या रॅकेटच्या मुळापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न सुरू ठेवला. वडगाव मावळ येथील मारुती ढोरे याच्याकडूनही अवैध लिंगनिदानासाठी वापरले जाणारे मशीन जप्त करण्यात आले. दरम्यान, पुण्यातील



### ५ सोनोग्राफी मशीन, ५ वाहने जप्त

**या गुन्ह्याच्या तपासात आतापर्यंत पाच अवैध सोनोग्राफी मशीन, चार चारचाकी वाहने आणि एक दुचाकी विविध ठिकाणांहून जप्त करण्यात आली आहेत. अनेक जिल्ह्यांमध्ये पसरलेल्या या रॅकेटचे धागेदोरे पोलिसांच्या हाती लागल्याने आणखी मोठे खुलासे होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.**

आरोपींकडून नाशिक जिल्ह्यातील निफाड तालुक्यातील डॉक्टरांनीही अवैधरीत्या सोनोग्राफी मशीन खरेदी केल्याचे तपासात निष्पन्न झाले. त्यानुसार पोलिसांनी डॉ. कुणाल वलटे आणि मेडिकल चालक सागर उन्हाळ यांना ताब्यात घेऊन अटक केली.

यानंतर श्रीगोंदा तालुक्यातील घोगरगाव येथील मेडिकल चालक जालिंदर रामदास बोरुडे (वय ४०) यालाही अटक करण्यात आली. चौकशीदरम्यान त्याने अनेक गर्भवती महिलांच्या बेकायदेशीर लिंगनिदान चाचण्या केल्याची कबुली दिली. तसेच या गैरकृत्यात एजंट म्हणून राम किसन पवार ऊर्फ तपोश शिबू सरकार (रा. मलठण, ता. कर्जत) हा मदत करत असल्याचे समोर आले. पोलिसांनी त्याला अटक केली असून त्याच्याकडून गर्भपातासाठी वापरल्या जाणाऱ्या गोळ्याही जप्त करण्यात आल्या आहेत. न्यायालयाने त्याला १६ जूनपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

याच तपासात पुण्यातील आणखी एका डॉक्टरचा सहभाग उघड झाल्याने डॉ. अतुल अंकुश जाधव (रा. वाघोली, पुणे) यांना अटक करण्यात आली. तेही अवैध गर्भलिंग निदान चाचण्या करत असल्याचे तपासात निष्पन्न झाले असून न्यायालयाने त्यांनाही सहा दिवसांची पोलीस कोठडी मंजूर केली आहे. अहिल्यानगर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक एम. सुदर्शन व अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी भारती आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक आठरे हे या गुन्ह्याचा सखोल तपास करत आहेत. पोलिसांच्या या कारवाईमुळे अवैध गर्भलिंग निदान आणि स्त्रीभ्रूणहत्या रोखण्यासाठी मोठा धक्का बसल्याचे मानले जात आहे.

# अखेर ५० वर्षांचा वनवास संपला

## आमदार अमोल खताळ यांच्या पुढाकाराने मालदाड-घुलेवाडीचा शिवरस्ता खुला



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -संगमनेर तालुक्यातील मालदाड-घुलेवाडी शिवेवरील गव्हाळी वस्तीला जाणारा सुमारे तीन ते चार किलोमीटर अंतराचा महत्त्वाचा शिवरस्ता पन्नास वर्षांपासून विविध अतिक्रमणांमुळे बंद अवस्थेत होता. परिणामी परिसरातील शेतकरी, विद्यार्थी, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना दैनंदिन जीवनात मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. मात्र आ. अमोल खताळ यांच्या पुढाकारामुळे आणि महसूल व पोलीस प्रशासनाच्या संयुक्त प्रयत्नांमुळे हा रस्ता तीन टप्प्यांत अवघ्या पंधरा दिवसांत अतिक्रमणमुक्त करून नागरिकांसाठी खुला करण्यात आला आहे.

मालदाड व घुलेवाडी परिसरातील अनेकांनी वर्षानुवर्षे शिवरस्त्यावर अतिक्रमणे केली होती. त्यामुळे गव्हाळी वस्तीतील सुमारे अडीचशे ते तीनशे नागरिकांचा गावाशी संपर्क साधणारा महत्त्वाचा मार्गच बंद झाला होता. नागरिकांची दैनंदिन कामे मोठ्या अडचणीने पार पडत होती. या प्रश्नाबाबत परिसरातील नागरिकांनी आणि शेतकऱ्यांनी अनेकदा प्रशासन व लोकप्रतिनिधींकडे पाठपुरावा केला होता; मात्र प्रश्न कायम प्रलंबित राहिला.अखेर गव्हाळी वस्तीतील शेतकरी, महिला आणि युवकांनी एकत्र येत आ. अमोल खताळ यांची भेट घेतली. आपल्या रस्त्याचा प्रश्न सोडविण्याची अपेक्षा व्यक्त करत त्यांनी संपूर्ण परिस्थिती आमदारांच्या निदर्शनास आणून दिली. याची तात्काळ दखल घेत आ. खताळ यांनी महसूल विभागाला पाहणी करून शिवरस्ता योजनेअंतर्गत रस्ता खुला करण्याचे निर्देश दिले.

त्यानुसार तहसीलदार धीरज मांजरे यांनी स्वतः घटनास्थळी भेट देत परिस्थितीची पाहणी केली. त्यांनी मालदाड व घुलेवाडी येथील महसूल अधिकाऱ्यांना रस्ता तातडीने खुला करण्याच्या सूचना दिल्या. त्यानंतर घुलेवाडीचे मंडलाधिकारी रफिक शेख, महसूल अधिकारी बाळकृष्ण सावळे, मालदाडचे महसूल अधिकारी राहुल ढेरंगे, भूमीअभिलेख विभागाचे भूमापक नितीन हंडोरे तसेच तालुका पोलीस निरीक्षक प्रवीण साळुंखे यांच्या संयुक्त पथकाने मोहीम राबवून हा शिवरस्ता तीन टप्प्यांत अतिक्रमणमुक्त केला.

कारवाईदरम्यान अनेक अडथळे आणि अडचणी निर्माण झाल्या; मात्र प्रशासनाने संयम आणि नियोजनाच्या जोरावर त्या दूर करत रस्ता मोकळा केला. नागरिकांनी आ. अमोल खताळ तसेच प्रशासनाचे मनापासून आभार मानले आहेत.

**आता विकासाचा मार्गही मोकळा होणार...**

**गेल्या अनेक दशकांपासून बंद असलेला मालदाड-घुलेवाडी शिवरस्ता खुला झाल्यामुळे गव्हाळी वस्तीतील नागरिकांच्या दैनंदिन जीवनातील अनेक अडचणी दूर होणार आहेत. विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठीची ये-जा, शेतमालाची वाहतूक, रुग्णांची ने-आण आणि नागरिकांची दैनंदिन कामे आता अधिक सुलभ होणार आहेत. रस्ता खुला झाल्याचा आनंद असला तरी त्याचे मजबुतीकरण आणि डांबरीकरण लवकरात लवकर करण्यात यावे, अशी अपेक्षा ज्येष्ठ नागरिक दत्तू नवले, राहुल नवले, गणेश नवले, संतोष नवले, दिगंबर नवले, रेखा नवले, कुमारी श्रावणी नवले, कार्तिक नवले यांच्यासह परिसरातील शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.**

# संगमनेरच्या रखडलेल्या रस्त्यांच्या कामांसाठी पायल ताजणे यांचा पालकमंत्र्यांकडे पाठपुरावा



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर शहरातील नागरिकांच्या दैनंदिन वाहतुकीशी निगडित महत्त्वाच्या रस्ते विकास कामांना शासनाकडून विशेष रस्ता अनुदान २०२५-२६ अंतर्गत मंजुरी मिळाली असली तरी अनेक कामांना अद्याप प्रत्यक्ष सुरुवात झालेली नाही. याबत तीव्र खंत व्यक्त करत भारतीय जनता पार्टीच्या शहराध्यक्षा सौ. पायलताई आशिष ताजणे यांनी जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. राधाकृष्णजी विखे यांची भेट घेऊन तातडीने कामे सुरू करण्याची मागणी केली.

सौ. पायलताई ताजणे म्हणाल्या, शहराच्या विकासासाठी पालकमंत्री राधाकृष्णजी विखे पाटील नेहमीच विशेष सहकार्य केले आहे. त्यांच्या प्रयत्नांमुळेच संगमनेरला कोट्यवधींचा निधी मंजूर होऊन शहराच्या पायाभूत सुविधांना गती मिळाली आहे. या सहकार्याबद्दल संगमनेरकरांच्या वतीने मी मनःपूर्वक आभार व्यक्त करते. शासनाच्या विशेष रस्ता अनुदान योजनेअंतर्गत संगमनेर शहरातील विविध प्रभागांमधील रस्त्यांचे काँक्रिटीकरण, डांबरीकरण व इतर नागरी सुविधा विकासासाठी मोठ्या प्रमाणात निधी मंजूर झाला आहे. मात्र प्रशासकीय प्रक्रिया व निधी मंजुरीनंतरही अनेक कामे प्रत्यक्षात सुरू न झाल्याने नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण आहे.

विशेषतः नवीन नगर रोड हा शहरातील अतिशय महत्त्वाचा आणि रहदारीचा मुख्य मार्ग आहे. या मार्गावरील रस्त्यांची अवस्था अत्यंत दयनीय झाली असून, दररोज हजारो नागरिक, विद्यार्थी, व्यापारी तसेच रुग्णवाहिकांना याचा त्रास सहन करावा लागत आहे. तसेच नादुरुस्त गटारीमुळे पावसाळ्यात गाळेधारकांना होणारा त्रास नुकसानदायक आहे. खराब रस्त्यांमुळे अपघातांचा देखील धोका वाढला आहे. पावसाळा तोंडावर आलेला असताना मंजूर विकासकामे तातडीने सुरू होणे आवश्यक आहे. याची दखल घेत पालकमंत्री ना. राधाकृष्णजी विखे पाटील यांनी विषय गांभीर्याने घेऊन संबंधित यंत्रणेशी तातडीने चर्चा केली आणि लवकरात लवकर काम पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या.

संगमनेर शहराच्या विकासासाठी भाजप कटिबद्ध असून, नागरिकांच्या मूलभूत सुविधांच्या प्रश्नांवर सातत्याने पाठपुरावा सुरू राहणार असल्याचे सौ. पायलताई ताजणे यांनी स्पष्ट केले.
















ताम्हाणे हॉस्पिटल
पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
अधुनिक उपचार पद्धती
● कमी वेदना, जलद बरे होणे
● लेझर व प्रगत तंत्रज्ञान
● अनुभवी जज्ञ डॉक्टरांचा सल्ला
● गोपनीयतेची पूर्ण काळजी
फोन नं. ०२४२५-२२००५०
आजचा संपर्क करा- 7219100100
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

दैनिक युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

पेजिनेशनसाठी अनुभवी व्यक्ती पाहिजे
GRAPHIC DESIGNER
CorelDRAW Ps Ai Id
Send Resume on Whatsapp
Contact : 7720046005



भंडारी
"शुभकार्यासाठी शुभवस्त्रखरेदी"
शेरवाणी । कुर्तापायजमा । ब्लेजर । जोधपुरी
पैठणी । घागरा । शालु । कांजीवरम । प्युअरसिल्क । डिजायनर सारीज्
मेनरोड कॉर्नर, संगमनेर

# गुंतवणूकीचे आमिष, १.१० कोटींची फसवणूक

## नात्याला तडा, तरूणीला सहा महिन्यांचा कारावास, १.३० कोटींचा दंड

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -शेअर मार्केट व फॉरेक्स ट्रेंडिंगमधून मोठा नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवत नातेवाईक महिलेकडून कोट्यवधी रुपयांची रक्कम स्वीकारल्यानंतर दिलेले १ कोटी १० लाख रुपयांचे चार धनादेश बाऊन्स झाल्याप्रकरणी संगमनेर न्यायालयाने पुण्यातील तरुणीला दोषी ठरवत सहा महिन्यांच्या साध्या कारावासाची शिक्षा सुनावली आहे. याशिवाय आरोपीवर तब्बल १ कोटी ३० लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला असून त्यापैकी १ कोटी २० लाख रुपये फिर्यादीला नुकसानभरपाई म्हणून देण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत.

अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी चं. प्र. रघुवंशी यांनी हा महत्त्वपूर्ण निकाल दिला. या प्रकरणातील फिर्यादी अर्चना सुदर्शन पारख (रा. संगमनेर) यांनी दाखल केलेल्या तक्रारीनुसार आरोपी सिध्दी गौतम खिंवसरा (रा. पुणे) ही त्यांची जवळची नातेवाईक असून ती शेअर मार्केट व फॉरेक्स ट्रेडिंगमध्ये गुंतवणूक करून मोठा नफा कमावत असल्याचा दावा करीत होती. आरोपी व तिच्या कुटुंबीयांनी फिर्यादीला महिना चार टक्के परतावा आणि दोन वर्षांनंतर मुद्दल परत देण्याचे आश्वासन दिले होते. विश्वास संपादन केल्यानंतर फिर्यादी व त्यांच्या कुटुंबीयांनी विविध टप्प्यांमध्ये ऑनलाईन आणि रोख स्वरूपात मोठी रक्कम आरोपीकडे दिली. न्यायालयीन नोंदीनुसार आरोपीने काही रक्कम परत केली असली तरी मोठी देय रक्कम बाकी राहिली होती.

१.१० कोटींचे चार चेक दिले; मात्र सर्वच अनादरित देय रक्कम परत करण्यासाठी आरोपीने फिर्यादीला एचडीएफसी बँकेचे ३० लाख, २० लाख, २० लाख आणि ४० लाख रुपयांचे असे एकूण १ कोटी १० लाख रुपयांचे चार धनादेश दिले. मात्र हे धनादेश बँकेत सादर केल्यानंतर एक धनादेश 'अपर्याप्त निधी' तर उर्वरित तीन धनादेश 'पेमेंट स्टॉप्ड बाय ड्रॉवर' या कारणाने परत आले.




यानंतर फिर्यादीने कायदेशीर नोटीस पाठवून रकमेची मागणी केली. नोटीस प्राप्त होऊनही आरोपीने रक्कम न दिल्याने परक्राम्य संलेख अधिनियमाच्या कलम १३८ अंतर्गत न्यायालयात खटला दाखल करण्यात आला.

सुनावणीदरम्यान आरोपीने धनादेश दबावाखाली घेतल्याचा दावा केला. मात्र त्या दाव्याला कोणताही पुरावा सादर करण्यात आला नाही. उलट नोटीसच्या उत्तरात आरोपीने फिर्यादीकडून लाखो रुपये ऑनलाईन स्वरूपात प्राप्त झाल्याची कबुली दिल्याचे न्यायालयाने नमूद केले.

- नातेवाईकांच्या विश्वासाचा गैरफायदा घेतल्याचा आरोप.
- शेअर मार्केट आणि फॉरेक्स ट्रेडिंगच्या नावाखाली मोठी आर्थिक देवाणघेवाण.
- १.१० कोटी रुपयांचे चार धनादेश बाऊन्स.
- आरोपीकडून लाखो रुपये प्राप्त झाल्याची लेखी कबुली न्यायालयात महत्त्वाची ठरली.
- संगमनेर न्यायालयाचा १.३० कोटी रुपयांच्या दंडासह कठोर निर्णय.

न्यायालयाने निरीक्षण नोंदविताना म्हटले की, आरोपीने धनादेश जारी केले, ते कायदेशीर देयकाच्या मोबदल्यात होते आणि त्यांचे अनादरण झाल्याचे पुराव्यावरून स्पष्ट सिद्ध झाले आहे. तसेच आरोपीने स्वतःचा बचाव सिद्ध करण्यासाठी कोणताही ठोस पुरावा सादर केला नाही.

निकाल देताना न्यायालयाने नमूद केले की, धनादेश व्यवहारावरील विश्वास टिकवून ठेवणे आवश्यक आहे. अशा प्रकारच्या प्रकरणांमध्ये केवळ आर्थिक नुकसानच होत नाही तर नागरिकांचा धनादेश व्यवस्थेवरील विश्वासही डळमळीत होतो. त्यामुळे आरोपीला सहा महिन्यांच्या साध्या कारावासासह १ कोटी ३० लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला.

त्यापैकी १ कोटी २० लाख रुपये फिर्यादीला नुकसान भरपाई म्हणून देण्याचे आदेश देण्यात आले असून उर्वरित १० लाख रुपये शासन जमा करण्यात येणार आहेत. हा निकाल आर्थिक व्यवहारांमध्ये विश्वास, पारदर्शकता आणि धनादेशांच्या विश्वासार्हतेबाबत महत्त्वाचा संदेश देणारा ठरला आहे.

Vedश्रुति आयुर्वेद आणि पंचकर्म केंद्र
Dhanvantari Multispeciality Hospital DMH We Treat, He Cures
मुतखडा आहे?
आयुर्वेदिक मार्गदर्शन शिबिर
त्रास होतोय का ?
✻ लघवीत जळजळ
✻ कंबर, पोट किंवा पाठ दुखते
✻ वारंवार मुतखडा होतो
मुतखडा विरघळून पडतो
पुन्हा मुतखडा होऊ नये म्हणून मदत
डॉ. चंद्रकांत गुजर
आयुर्वेद व पंचकर्म तज्ञ
आयुर्वेदिक उपचाराचे फायदे
मुतखडा विरघळून पडतो | वेदना व जळजळ कमी करण्यात मदत | पुन्हा मुतखडा होऊ नये म्हणून मदत | नैसर्गिक व सुरक्षित उपचार
नोंदणी शुल्क 99 /-
संपूर्ण आयुर्वेदिक औषधे (१महिना) 1999 /-
शनिवार दि.१३ जून २०२६
वेळ सकाळी १० ते दुपारी ३
-: ठिकाण :- धन्वंतरी मल्टी स्पेशोलिटी हॉस्पिटल ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
Mo.8446220164
रुग्णांनी जुने सोनोग्राफी व इतर रिपोर्ट्स् सोबत आणावेत
नैसर्गिक उपचार ✻ सुरक्षित ✻ परिणामकारक

# गडगे प्रकरणातील फरार आरोपींना अटक करा

## बनावट व्हिडीओ, बोगस औषधसाठा चौकशीची मागणी - ॲड. रंजना गवांदे



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - राजेंद्र गडगे यांच्याविरोधात दाखल झालेल्या गुन्ह्याला दीड महिन्यांहून अधिक कालावधी उलटूनही या प्रकरणातील तीन आरोपी अद्याप फरार असल्याने त्यांना तात्काळ अटक करून तपास जलदगतीने पूर्ण करावा, अशी मागणी अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या सरचिटणीस तथा फिर्यादी ड. रंजना गवांदे यांनी संबंधित तपास यंत्रणांकडे केली आहे. या प्रकरणातील आरोपी मोहन पुरी, ज्ञानेश्वरी गडगे आणि सुरज शिंदे यांनी अटकपूर्व जामिनासाठी अर्ज केला होता. मात्र तो अर्ज संगमनेर येथील जिल्हा व सत्र न्यायालयाने फेटाळून लावला आहे. तरीदेखील संबंधित आरोपी अद्याप अटकेबाहेर असल्याचा आरोप गवांदे यांनी केला आहे.

दरम्यान, मुख्य आरोपी राजेंद्र गडगे आणि मधुकर शिंदे हे जामिनावर मुक्त झाले असले तरी या प्रकरणातील अनेक महत्त्वाच्या बाबींचा तपास अद्याप बाकी असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. स्वतःला धमकावण्यासाठी आणि दहशत निर्माण करण्याच्या उद्देशाने आपली प्रतिमा वापरून बनावट व्हिडीओ तयार करण्यात आला आणि तो समाजमाध्यमांवर व्हायरल करण्यात आल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला आहे. या कथित व्हिडीओ निर्मिती आणि प्रसारामध्ये आरोपी क्रमांक १ ते ४ यांच्यासह महेश दिघे, राजेंद्र गडगे यांचा मुलगा तसेच इतर काही व्यक्तींचा सहभाग असल्याचा दावा त्यांनी केला आहे. त्यामुळे या सर्वांना सहआरोपी करण्यात यावे, अशी मागणीही करण्यात आली आहे. गवांदे यांच्या म्हणण्यानुसार, १२ एप्रिल २०२६ रोजी रात्री आरोपी क्रमांक २ व ३ तसेच गडगे यांची पत्नी त्यांच्या निवासस्थानी आली होती. यावेळी गडगे यांचा मुलगाही चारचाकी वाहनासह तेथे उपस्थित होता. या घटनेचे सीसीटीव्ही फुटेज आणि इतर पुरावे उपलब्ध असून ते तपास यंत्रणांना देण्यास आपण तयार असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

**ट्रस्ट, मालमत्ता आणि औषधसाठ्याची चौकशी करण्याची मागणी -**

राजेंद्र गडगे यांनी दत्तधाम सरकार या नावाने स्थापन केलेल्या ट्रस्टच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार केल्याचा आरोपही गवांदे यांनी केला आहे. सर्वसामान्य भक्तांचे शोषण करून मोठी मालमत्ता उभी करण्यात आल्याचा दावा करत ट्रस्टच्या आर्थिक व्यवहारांची आणि मालमत्तेची सखोल चौकशी व्हावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. याशिवाय गडगे यांच्या आश्रमात आणि आश्रमाबाहेर मोठ्या प्रमाणात बेकायदेशीर औषधसाठा आढळल्याचा दावा करण्यात आला असून, याबाबत अन्न व औषध प्रशासनाने तातडीने कारवाई करावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.

**ड्रग अँड कॉस्मेटिक्स कायद्यांतर्गत कारवाईची मागणी -**

आश्रमातील पंचनाम्यात बोगस औषधांचा साठा आढळून आल्याचा दावा करत ड्रग अँड कॉस्मेटिक्स क्टमधील कलम १८(अ), १७ आणि १७(ब) अंतर्गत कारवाई करण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच कोणताही वैध परवाना नसताना औषधनिर्मिती व विक्री केल्याचा आरोपही करण्यात आला आहे. ड्रोनद्वारे नागरिकांवर पाळत ठेवल्याचाही आरोप- गावकऱ्यांनी १६ एप्रिल २०२६ रोजी प्रांताधिकारी आणि संबंधित अधिकाऱ्यांकडे दिलेल्या लेखी तक्रारीनुसार, गडगे यांच्या आश्रम परिसरातील वस्त्यांवर रात्रीच्या वेळी ड्रोन फिरवून नागरिकांच्या हालचालींवर पाळत ठेवण्यात येत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. ही बाब अत्यंत गंभीर असून त्याबाबत स्वतंत्र गुन्हा दाखल करून चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

**फरार आरोपींसह इतरांवरही कारवाईची मागणी -**

मोहन पुरी याच्या नाशिक, नाशिक रोड, जळगाव, मुंबई सेंट्रल आणि सिन्नर परिसरातील कथित बनावट औषधनिर्मिती केंद्रांवर तातडीने छापे टाकून कारवाई करावी, तसेच उर्वरित आरोपींना अटक करून संपूर्ण प्रकरणाचा निष्पक्ष आणि जलद तपास पूर्ण करावा, अशी मागणी ड. रंजना गवांदे यांनी संबंधित यंत्रणांकडे केली आहे.

कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा
पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना
ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25